महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.
Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

कोविमं/माध्य.परीक्षा/ 859
कोल्हापूर- ४१६ ००४
दिनांक-०४/०३/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय : इ.१० वी शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता निवड करण्यात आलेल्या संस्थांच्या मान्यतेबाबत.**

**संदर्भ:- १) शासन पत्र क्र.९२४/प्र.क्र.९६/एस.डी.-२/दि.२४/०९/२०२४**
**२) राज्यमंडळाचे पत्र क्र. रामं./परीक्षा-७/४७७२, दि.१३/१२/२०२४.**
**३) सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन,यांचे पत्र क्र.साकासं/५१२५ दि.३०/१२/२२४**
**४) क्र.रा.मं./परीक्षा-७/८६५ दि.०१/०३/२०२५ चे पत्र**
**५) कोविमं/माध्य.परीक्षा/१३३२ दि.२३/०७/२०२४**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, इ. १० वी परीक्षेमध्ये शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्यात येतात. सांस्कृतिक कार्य संचालनालय,महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून प्राप्त यादीनुसारच मार्च २०२५ च्या परीक्षेमध्ये शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता ५२ संस्थांचीच प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.

सदर ५२ संस्थाच्या यादीमध्ये जय शिव बहुउद्देशिय शिक्षण मंडळ, संचलित विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर, जि.लातूर या संस्थेचा समावेश नाही. त्यामुळे जय शिव बहुउद्देशिय शिक्षण मंडळ, संचलित विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर, जि.लातूर या संस्थेच्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला/लोककला प्रकारातील सवलतीचे गुण देण्यात येणार नाहीत तसेच सदरच्या संस्थेचे प्रस्ताव मंडळ कार्यालयामध्ये सादर करण्यात येवू नयेत.

याबाबत संदर्भिय पत्र क्र. ५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर